डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

नाटयशास्त्र विभाग

**वृत्त प्रकाशनार्थ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाटयशास्त्र विभाग अंतर्गत ४० वा एकांकिका महोत्सवाचे उद्‌घाटन दि. ३१ आक्टोंबर रोजी नाटयशास्त्र विभागात उद्‌घाटक नाटककार मा. प्रकाश त्रिभूवन यांच्या हस्ते नटराज पूजन व दिप-प्रज्वलन करुन करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे प्रसिद्ध सिनेमॉटोग्राफर मा. अमोल गोळे व नाटयशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर यांची उपस्थिती होती. उद्‌घाटन प्रसंगी बोलताना नाटककार प्रकाश त्रिभूवन म्हणाले की, दलित रंगभूमीची चळवळ ज्यावेळी उभारी घेत होती त्यावेळी विविध दलित नाटकांचे लेखन व सादरीकरण होत गेले. त्यावेळी मात्र दलित नाटकांची हेटाळणी झाली असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी रंगभूमीवरील नाटय चळवळीचा आढावा घेतला त्यावेळी नाटकाविषयी लोकांचे वाईट मत होते आता त्यात परिर्वतन होत गेले व नाटकास चांगले दिवस आले असे ते म्हणाले. यावेळी बोलताना अमोल गोळे यांनी रंगमंच्यावरील कलावंता इतकाच पडद्यामागील कलावंतही तितकाच महत्वाचा असतो त्यांने आपल्या कार्यात झोकून दिले पाहिजे असे ते म्हणाले.

अध्यक्ष समारोप व प्रास्ताविक करतांना नाटयशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. शशिकांत ब-हाणपूरकर म्हणाले की, विभागातील एकांकिका महोत्सवात एकूण १८ कलाकृती सादर होणार असून त्यात ०९ कलाकृती या विद्यार्थ्यांनी स्वलिखित आहेत. या नाटयकृतीत विविध विषयावर भाष्य करुन कलावंत आपल्या अभिनय कौशल्यातून आपली कला सादर करणार आहे. यावेळी त्यांनी विभागातील कार्याचा आढावा घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नाटयनिर्देशक श्री. सुनिल टाक यांनी मानले. या कार्यक्रमास श्रीमती. विजया शिरोळे, रमाकांत मुळे,डॉ. जयंत शेवतेकर, प्रा. स्मिता साबळे, प्रा.गजानन दांडगे, प्रा.डॉ. अशोक बंडगर, प्रा.डॉ. वैशाली बोदेले, प्रा. गणेश शिंदे, प्रा. विशाखा शिरवाडकर, रंगमंच प्रकाश तश्र श्री. रामदास ठोके यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वरीष्ठ सहाय्यक श्री. जयदत्त शुक्ला, संदीप बुरसे, उत्तम सुरे, मोहन घोरपडे, धरमसिंग आडे, गोविंद कांबळे यांनी सहकार्य केले. उद्‌घाटना नंतर धर्मवीर भारती लिखीत व सय्यद अल्ताफ व संगीता बनकर दिग्दर्शित **नदी प्यासी थी** व अमोल पानबुडे लिखीत आणि विनोद आघाव व रतन सोमवारे दिग्दर्शित **तहान** या एकांकिका सादर झाल्या.


40th One Act Play (2015-16)